# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ३२

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समिती सभेसाठी प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर निर्णय घेणेसाठी **गुरुवार दिनांक १२/०६/२०२५ सकाळी ११-०० वाजता स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्रीमती अमिता दगडे-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्रीमती अमिता दगडे-पाटील | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती करुणा डहाळे | अति.आयुक्त |
| ३. | श्रीमती शोभा बाविस्कर | उपायुक्त |
| ४. | श्रीमती स्वालिया मालगावे | उपायुक्त (कर) |
| ५. | श्री.किशोर सुडके | सहाय्यक आयुक्त |
| ६. | श्री शाहेद शेख मो. शेख | मुख्यलेखापरीक्षक |
| ७. | श्री सुनिलकुमार सुर्यवंशी | उपमुख्यलेखापरीक्षक |
| ८. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ९. | श्री महेंद्र परदेशी | नगररचनाकार |
| १०. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य. अभियंता |
| ११. | चंद्रकांत मोरे | लेखा विभाग |
| १२. | श्री के.डी साबळे | लिपीक आस्थापा विभाग |
| १३. | श्री.लक्ष्मण पाटील | प्र.सहा.आरोग्याधिकारी |
| १४. | श्री.चंद्रकांत उगले | उप अभियंता, पाणीपुरवठा विभाग |
| १५. | श्री एन.के. बागुल | उप अभियंता , विद्युत विभाग |
| १६. | श्री.प्रदीप चव्हाण | उप अभियंता, बांधकाम विभाग |
| १७. | श्री प्रकाश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १८. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभियंता नगररचना |
| १९. | श्री हेमंत पावटे | सहा. अभियंता बांधकाम |
| २०. | श्री.राजेंद्र माईनकर | भांडारपाल, भांडार विभाग |
| २१. | श्री मधुकर निकुंभे | वसुली विभाग |
| २२. | श्री संभाजी सुडके | शिक्षणमंडळ |
| २३. | श्री.अनिल भडागे | प्र.वाहन विभागप्रमुख |
| २४. | श्री प्रसाद जाधव | अति क्रमण अधिक्षक |
| २५. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरीक्षक |
| २६. | श्री विकास साळवे | स्वच्छता निरीक्षक |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**मा.प्रशासक:-** आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे

# सदर बैठकीत पारीत झालेले ठराव व प्रस्ताव

---

**प्रशासक ठराव क्र.४८२** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. नगरसचिव विभागाकडील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३१ चे इतिवृत्त

विषय क्रमांक:-५०४ मागील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३१ चे इतिवृत्त वाचून कायम करणे.

---

वाचा क्र.०१ व नगरसचिव विभागाकडील प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक २८, २९ व ३० चे इतिवृत्त तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रशासकीय स्थायी समिती सभा क्रमांक ३१ दिनांक ००/०६/२०२५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ४७७ ते ४८१ क्रमश:वाचून कायम करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४८३** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / मुलेप कार्य. / जा.क्र. १४ दिनांक ०२/०६/२०२५

विषय क्रमांक:-५०५ महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५(१) अन्वये लेख्यांचा साप्ताहिक तपासणी अहवाल स्थायी समितीपुढे अवलोकनार्थ सादर.

---

वाचा क्र.०१ व मुख्य लेखापरीक्षक विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १०५(१) अन्वये विहीत करण्यात आलेल्या महानगरपालिकेच्या लेख्यांची साप्ताहीक तपासणी **दि. ०५/०५/२०२५ ते दि.०९/०५/२०२५** पर्यत तसेच **दि. १३/०५/२०२५ ते दि. १६/०५/२०२५ व दि. १९/०५/२०२५ ते दि. २३/०५/२०२५** पर्यंत तसेच दिनांक **२६/०५/२०२५ ते दि. ३०/०५/२०२५** तपासणी करण्यांत आलेली आहे.

त्यानुसार मा. लेखा परीक्षक यांच्या मार्फत उक्त कालावधीत झालेल्या साप्ताहिक तपासणी लेख्यांचा अहवाल मे.स्थायी समिती समोर वाचून सादर करण्यांत आला.

या अहवालातील निष्कर्षानुसार लेखा परिक्षण विभागाने लेखा विभागाशी समन्वय ठेऊन याबाबतची पडताळणी करुन आवश्यक ती पूर्तता त्वरीत करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४८४** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु.वि/ १३६ दिनांक २२/०५/२०२५

विषय क्रमांक:-५०६ प्रभाग क्र. १६ व ७, अहिल्यादेवी नगर, भीमनगर व समता नगर येथे HDPE पाईप लाईन टाकणे कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रभाग क्र. १६ व ७, अहिल्यादेवी नगर, भीमनगर व समता नगर येथे उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन गळती होत असल्यामुळे स्थलांतरित करणे गरजेचे होते.

सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/2023-24 नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. २,०२,८०८/- मात्र खर्च अपेक्षित आहे.सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाणी पुरवठा निधीतुन कामासाठी रू. ६५ लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,०२,८०८/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार ए. के. सैफी ठेकेदार यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, प्रभाग क्र. १६ व ७, अहिल्यादेवी नगर, भीमनगर व समता नगर येथे HDPE पाईप लाईन टाकणे कामी झालेल्या रक्कम रू. २,०२,८०८/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४८५** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / जा.वि/१४ दिनांक २७/०५/२०२५

विषय क्रमांक:-५०७ धुळे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत होर्डींग निष्कासीत करणेकरीता खाजगी संस्था नियुक्त करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व जाहिरात विभाग प्रमुख, जाहिरात विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका हद्दीतील धुळे मनपाची परवानगी न घेता अनधिकृत होर्डींग शहरात लागले आहेत तसेच दि.२८/५/२०२४ रोजी मा.मुख्यमंत्री व मा.उपमुख्यमंत्री महोदय यांनी मान्सुन पुर्व आढावा घेण्यात आला असुन मा.जिल्हा अधिकारी यांचे कार्यालयात व्ही.सी.द्वारे निर्देश देण्यात आले की, शहरातील अनधिकृत होर्डींग बॅनर विना नोटीस देता तात्काळ काढणे बाबत सुचना केलेल्या आहेत.

त्यावेळेस मा.आयुक्त सो यांचे आदेशाने समिती गठीत करणेत आली होती.त्यानुसार जाहिरात विभाग मार्फत मशीनरी,हायड्रा मशिन,ट्रॅक्टर,गॅस कटर छोटा (ACE) वाहन इत्यादी भाडे तत्वावर घेऊन एकुण ५० ते ५२ होर्डींग निष्कासीत करणेत आले तरी उर्वरीत होर्डींग धारक यांना स्ट्रक्चरल ऑडीट करणेसाठी संबंधीत होर्डींग धारक यांना पत्र देण्यात आलेले आहे.

तरी संबंधीत होर्डींग धारकापैकी बरेचसे होर्डींग धारक यांनी स्ट्रक्चरल ऑडीट रिपोर्ट मनपा कडेस सादर केलेला आहे त्या स्ट्रक्चरल ऑडीटची तपासणी मनपा मार्फत स्ट्रक्चरल ऑडीटची तपासणी करणेसाठी सुनिल मुदंडा यांची नियुक्ती करणेत आली आहे.सदर होर्डींग मध्ये किरकोळ दुरुस्ती त्यांनी सुचविली आहे.त्यानुसार संबंधीत होर्डींग धारक यांना नोटीस देण्यात आलेल्या आहेत व त्या संदर्भात तातडीने पुढील कार्यवाही करणेत येत आहे.

शहरात अनधिकृत होर्डींग अंदाजे ६० ते ७० आहेत सदर होर्डींग निष्कासीत करणेस मे.हिन्दुस्थान इंटरप्रायजेस यांनी एकूण सर्व करासोबत रक्कम रु. **६,०१,८००/-** कामाचा तपशीलासह खर्च सादर केला आहे. त्यानुसार सदर खर्च मान्यतेसाठी स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव लक्षात घेता, धुळे महानगरपालिका हद्दीतील अनधिकृत होर्डींग निष्कासीत करणेकरीता खाजगी संस्था नियुक्त करणेकामी झालेल्या एकूण रक्कम रु. **६,०१,८००/-** खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४८६** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / भां.वि/१५ दिनांक ०२/०६/२०२५

विषय क्रमांक:-५०८ धुळे मनपा मार्फत खरेदी करण्यात आलेल्या टाटा सफारी वाहनासाठी टीडीएस रक्कम भरणेकामी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका कडेस स.न.२०१९-२०२० या आर्थिक वर्षात विद्यमान महापौर यांना कार्यालयीन कामासाठी नविन वाहन खरेदी करणेस Gem पोर्टल वर थेट खरेदी पध्दतीने (DIRECT PURCHASE) रु.१०,४५,२८७ मात्र मध्ये खरेदी करणेत आली.

सदर वाहन खरेदी करणेस Invoice No.१०००४२८३४८ ने खरेदी प्रमाणे १०,४४,२८४ मात्र रक्कम अदा करणेत आलेली आहे. तसेच Gem पोर्टलच्या खरेदी रक्कमेवर शासनाचा TDS वेगळा लागत असल्याने सदर वाहन पुरवठा धारक TATA कंपनीचे अधिकृत विक्रेते उज्वल ऑटो मोटिव्हस प्रा.लि.अवधान,धुळे यांनी पत्र सादर केले असुन सदर TDS रु.१०,४४३ मात्र मागणी केलेली आहे त्यानुसार स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव लक्षात घेता, धुळे मनपा मार्फत खरेदी करण्यात आलेल्या टाटा सफारी वाहनासाठी टीडीएस रक्कम भरणेकामी आलेल्या रु.१०,४४३/- खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४८७** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / भां.वि/१६ दिनांक ०२/०६/२०२५

विषय क्रमांक:-५०९ मनपा मालकीचे जुने भंगार साहित्य विक्री करणे कामी नियुक्त शासकीय व्हॅल्युअर यांचे दर व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका जुने भंगार साहित्याची विविध ठिकाणी पडलेले असुन सदर साहित्य विक्री करणे करिता मा.आयुक्त सो यांनी तातडीने सुचना दिलेल्या असुन सदर साहित्य विक्री करणे करिता सदर जुने भंगार साहित्याचे दर निश्चीत करणे गरजेचे आहे.

त्या अनुषंगाने सदरचे काम करणे तातडीचे असुन अति तात्काळ सदर काम करून घेणे गरजेचे असल्याने सदर कामासाठी मान्यता प्रस्ताव सादर करणेस पुरेसा वेळ नसल्याने सदरची बाब तातडीची म्हणुन

करणेस शासकीय व्हॅलुअर धारक यांना तातडीने पुरवठा आदेश देण्यास मा. आयुक्त सो. यांचे सुचने नुसार देण्यात आलेला आहे.

सदर शासकीय व्हॅलुअर धारक यांनी जुने भंगार साहित्याची विविध ठिकाणी पाहणी करुन सदरचे साहित्याचे योग्य ते दर ठरविणे बाबत एकूण रक्कम रुपये ३५,४००/- मात्रचे बिल प्राप्त झालेले आहे त्यानुसार स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव लक्षात घेता, मनपा मालकीचे जुने भंगार साहित्य विक्री करणे कामी नियुक्त शासकीय व्हॅल्युअर यांचे दर व रक्कम रुपये. ३५,४००/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४८८** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / भां.वि/ १७ दिनांक ०२/०६/२०२५

विषय क्रमांक:-५१० स्वच्छ सर्व्हेक्षण २०२२-२३ करीता व आरोग्य विषयक विविध साहित्य व त्यावर प्रिंटींग करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मा.उपायुक्त सो यांचे दालनात झालेल्या तातडीचे बैठकीत शहरातील नागरीका मध्ये जनजागृती करणे करीता शहरातील क्षेत्रात असे अनेक ठिकाणी विविध साहित्य व त्यावर छपाई करून लावणेस सुचित करणेत आले होते.

तसेच सदर काम हे प्रिन्टींग करणे असल्याने आपले कडील शासकीय पुरवठा धारक अलका प्रिन्टर्स हे डिलीटल बॅनर प्रिन्टींग चे काम करीत असता त्यांचे कडेस इतर साहित्याचा बाजार दर तपासुन त्यांचे बाजार दर इतरांपेक्षा कमी असल्याने सदरचे काम तातडीचे असल्याने त्यांचे कडुन करून घेण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे संबधीत कामाच्या सुचनेसार शहरात निर्देशीत केलेल्य ठिकाणी नियोजित वेळेत काम पुर्ण केलेले आहे.त्या नुसार अनुक्रमे अलका प्रिन्टर्स धुळे यांनी एकूण रक्कम रुपये ३,१८,०३१.००/- मात्र बिलाची मागणी केलेली आहे त्यानुसार सदर खर्च मान्यतेसाठी स्थायी समिती पुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव लक्षात घेता, स्वच्छ सर्व्हेक्षण २०२२-२३ करीता व आरोग्य विषयक विविध साहित्य व त्यावर प्रिंटींग करणेकामी झालेल्या रक्कम रुपये ३,१८,०३१.००/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४८९** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु.वि/ १६४ दिनांक ०२/०६/२०२५

विषय क्रमांक:-५११ शहरातील बॉम्बे लॉज चौक येथे क्रॉस कनेक्शन करणेकामी झालेल्या खर्चास खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

बॉम्बे लॉज चौक येथे क्रॉस कनेक्शन करणे बाबत. उक्तबाबत संबधित भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता सदर ठिकाणी पाईपलाईन लिकेज झाल्यामुळे पाण्याची नासाडी होत असल्याने सदर पाईपलाईन दुरुस्त करणे गरजेचे आहे.

सदर कामासाठी शासन दरसूची/म.जी.प्रा.विभाग/२०२३-२४ नुसार अंदाजपत्रकीय रक्कम रू. ४,६५,१४९/- मात्र खर्च अपेक्षित आहे. सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाणीपुरवठा निधीतुन कामासाठी रू. ६५ लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे.

तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,६५,१४९/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा श्री. संजय गायकवाड, ठेकेदार यांच्या कडून करून घेण्यास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त प्रस्ताव लक्षात घेता, शहरातील बॉम्बे लॉज चौक येथे क्रॉस कनेक्शन करणेकामी झालेल्या रक्कम रू. ४,६५,१४९/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९०** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु.वि/ १६३ दिनांक ०२/०६/२०२५

विषय क्रमांक:-५१२ प्रभाग क्र. १५ हनुमान टेकडी जवळील सिमेंट पाईप लाईन दुरुस्त करणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रभाग क्र. १५ हनुमान टेकडी जवळील भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन गळती होत असल्यामुळे स्थलांतरित करणे गरजेचे होते.

सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाणीपुरवठा निधीतुन कामासाठी रू. १२५ लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. १,७७,०८७/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम विना निविदा ठेकेदार ए.के.सैफी ठेकेदार यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी करिता मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाला लक्षात घेता, प्रभाग क्र. १५ हनुमान टेकडी जवळील सिमेंट पाईप लाईन दुरुस्त करणे कामी झालेल्या रक्कम रु. १,७७,०८७/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९१** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / पा.पु.वि/ १६५ दिनांक ०२/०६/२०२५

विषय क्रमांक:-५१३ प्रभाग क्र. ७ जुने SRPF क्वार्टर व शीतल कॉलनी येथे सिमेंट पाईप लाईन टाकणेकामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

प्रभाग क्र. ७ जुने SRPF क्वार्टर व शीतल कॉलनी भागातील क. अभियंता यांनी समक्ष पाहणी केली असता नकाणे गावात सिमेंट पाईप लाईन गळती होत असल्यामुळे स्थलांतरित करणे गरजेचे होते.

सन २०२४-२०२५ च्या अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार पाणीपुरवठा निधीतुन कामासाठी रू. १२५ लक्ष मात्र तरतूद आहे. सदरील तरतुदीनुसार उक्त प्रमाणे काम प्रस्तावित आहे. तरी उक्त काम तातडीने करणे आवश्यक असल्याने या कामास अंदाजपत्रकीय रक्कम रु. २,००,५१४/- चा खर्च अपेक्षित असून सदरचे काम

विना निविदा ठेकेदार श्री. चेतनकुमार सूर्यवंशी ठेकेदार यांच्या कडून करून घेणास व कार्योत्तर मंजुरी मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेलाआहे.

उक्त कार्यालयीन प्रस्ताव विचारात घेता, प्रभाग क्र. ७ जुने SRPF क्वार्टर व शीतल कॉलनी येथे सिमेंट पाईप लाईन टाकणेकामी झालेल्या रक्कम रु. २,००,५१४/- मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९२** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / औ.भांडार/४७ दिनांक ०३/०६/२०२५

विषय क्रमांक:-५१४ धुळे मनपा चे १२ ॲलोपॅथी दवाखाने, 3 सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्रासाठी व धुळे मनपा अंतर्गत असणा-या २२ आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी येणाऱ्या खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील १२ ॲलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह व १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्रासाठी व धुळे मनपा अंतर्गत असणा-या २२ आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी सर्जिकल व साहित्य भांडार विभागातुन पुरवठा होणेबाबत संबधीत दवाखान्यांचे वैद्यकिय अधिकारी व शहर कार्यक्रम व्यावस्थापक NUHM अधिकारी, औषधनिर्माण अधिकारी यांनी मा. आरोग्य अधिकारी यांचे मार्फत औषध भांडार विभागात रिपोर्ट सादर केला आहे. सदर सर्जीकल व साहित्याची यादी शासन निर्णयाप्रमाने Generic आहे.सन २०२५-२६ या वर्षासाठी ई-निविदा प्रसिध्द करणे आवश्यक आहे.

सन २०२५-२६ या वर्षासाठी स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करुन दर माघविल्यास ई-निविदा प्रनालीव्दारे प्राप्त झालेल्या तुलनात्मक सर्वात कमी दरांप्रमाणे खरेदी केल्यास बाबवार गुणवत्ता व दर यानुसार अनुक्रमे उत्कृष्ट व कमी असलेल्या दरांप्रमाणे सर्जिकल व साहित्य खरेदी होतील व मनपाचा आर्थीक फायदा होईल व रुग्णांसाठी चांगल्या प्रतिची सर्जिकल व साहित्य उपलब्ध होतील.

सन २०२५-२६ या वर्षात आरोग्य व सुखसोई या मुख्य लेखाशिर्षात, सर्जिकल व साहित्य खरेदी रु.७५,००,०००/- बजेट तरतुद प्रशासनाने सुचवली आहे. त्यामधुन यापुर्वी काहिही खर्च झालेला नाही.

सबब, सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी १०२ प्रकारचे सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी दि.०१/१२/२०१६ चे शासन निर्णयाप्रमाने स्थानिक बाजारभावादरांप्रमाणे तयार करण्यात आलेल्या अंदाजीत

रु.४७,७०,९६३/- मात्र खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यास विषय मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, धुळे मनपा चे १२ अॅलोपॅथी दवाखाने, 3 सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्रासाठी व धुळे मनपा अंतर्गत असणा-या २२ आरोग्य वर्धिनी केंद्राकरीता सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी सर्जिकल व साहित्य खरेदीसाठी येणाऱ्या रु.४७,७०,९६३/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. याबाबत तातडीने ई निविदा प्रसिध्दी बाबत कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९३** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये
२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / औ.भांडार/४८ दिनांक ०३/०६/२०२५

विषय क्रमांक:-५१५ धुळे मनपा चे १२ अॅलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्र (एकुण १७ दवाखाने)साठी सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी औषध खरेदीसाठी येणाऱ्या खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व वैद्यकीय अधिकारी, आरोग्य विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील १२ अॅलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह व १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्र (एकुण १७ दवाखाने)साठी सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी औषध भांडार विभागातुन पुरवठा होणेबाबत संबधीत दवाखान्यांचे वैद्यकिय अधिकारी यांनी मा. आरोग्य अधिकारी यांचे मार्फत औषध भांडार विभागात रिपोर्ट सादर केला आहे. सदर औषधांची यादी शासन निर्णयाप्रमाने Generic आहे.

भारत सरकारचे औषध मंत्रालयाने दि.०७/०२/२०२५ पासुन औषधांचे निर्धारीत केलेले दर (DPCO) प्रमाणे आहे. DPCO वर उपलब्ध नसलेली औषधांचे धुळे मनपाने शेवटचे खरेदी दरांप्रमाणे सर्व अॅलोपॅथी दवाखान्यांचे मागणी रिपोर्ट प्रमाणे १०३ प्रकारचे औषध खरेदीसाठी एकुण अंदाजित खर्च रु.६२,१२,३७२/- मात्र येणार आहे. सध्यस्थीतीत एकही शासकीय दरकरार अस्तीत्वात नाही.

धुळे मनपा चे १२ अॅलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्रासाठी सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी १०३ प्रकारचे औषध खरेदीसाठी DPCO दर व शेवटचे खरेदी दरांप्रमाने अंदाजीतखर्च रु.६२,१२,३७२/- मात्र येणार आहे.

सन २०२५-२६ या वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात औषध खरेदीसाठी प्रशासनाने सुचवलेले तरतुद एकुण रु.१,५०,००,०००/- मात्र आहे. यामधुन आयुर्वेद पंचकर्म रुग्णालयासाठी लागणारी आर्युर्वेद

औषधी खरेदीसाठी रु.१,०६,५६९/- मात्रचा प्रस्ताव सादर) केलेला आहे. ॲलोपॅथी औषध खरेदी साठी रु.१,४८,९३,४३१/- शिल्लक राहात आहेत.

सबब, ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी सन २०२५-२६ चे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार रु.६२,१२,३७२/- मात्र खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत तसेच स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यास विषय मे. स्थायी समिती पुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाला लक्षात घेता, धुळे मनपा चे १२ ॲलोपॅथी दवाखाने, ३ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, १ नागरी आरोग्यकेंद्र (एकुण १७ दवाखाने)साठी सन २०२५-२६ या वर्षासाठी लागणारी औषध खरेदीसाठी येणाऱ्या रु.६२,१२,३७२/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे. याबाबत तातडीने ई निविदा प्रसिध्दी बाबत कार्यवाही करावी.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९४** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /आस्था/ २४७ दिनांक ०४/०६/२०२५

विषय क्रमांक:-५१६ मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांना ६ महिने कालावधीकरीता फेरनियुक्ती देणेबाबत आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व कार्यालयीन अधिक्षक, आस्थापना विभाग, यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांना रु. १७,०००/- मात्र एकत्रित मानधनावर ६ महिने कालावधीकरीता आदेशात नमुद अटी व शर्तीस अधिन राहून नियुक्ती देण्यात आली होती.

प्रस्तावित मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांचा ६ महिने मानधनाचा कालावधी दि. १२/५/२०२५ व दि २०/५/२०२५ रोजी संपुष्ठात आलेला आहे.

प्रस्तावित मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांनी पुढील ६ महिनेकरीता एकत्रित मानधनावर फेर नियुक्ती मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे. प्रस्तावात नमुद एकूण १ ते २० मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) यांना ६ महिने कालावधीकरीता एकत्रित मानधनावर फेर नियुक्ती मिळणेबाबत संबंधीत विभाग प्रमुखांनी शिफारस केलेली आहे.

तरी संबंधित विभाग प्रमुख याच्या विनंतीनुसार उक्त नमूद अ.क्र. १ ते २० मानधनावरील कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या दिनाकापासून ०५ दिवसाची सेवा खंड करुन एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिन्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार मुदतवाढ देणेबाबतचा विषय में. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवालानुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ५३ (३) नुसार प्रस्तावात नमूद एकूण १ ते २० मानधनावरील लिपीक टंकलेखक (कॉम्प्युटर ऑपरेटर) कर्मचारी यांना मुदत संपल्याच्या

दिनांकापासून ०५ दिवसाची सेवा खंडीत करून एकत्रित मानधनावर पुढील ०६ महिने कालावधीकरीता फेर नियुक्ती देणेस मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९५** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा /बां.वि./ २० दिनांक १०/०६/२०२५

विषय क्रमांक:-५१७ प्र.क्र.८ मध्ये माधवपुरा तालीम वाली गल्ली येथे आरसीसी बंदिस्त गटार करण्याच्या कामी झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी मिळणेकामी आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व सहा. अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे महानगरपालिका अंतर्गत प्र.क्र.८ मध्ये माधवपुरा तालीम वाली गल्ली येथे आरसीसी बंदिस्त गटार आवश्यक आहे कारण तेथील परिसरात सांडपाण्याचा निचरा होत नसल्यामुळे सांडपाणी रस्त्यावर येत असल्याने दुर्गंध निर्माण होऊन येथील नागरिकांच्या आरोग्यात धोका निर्माण झाल्यामुळे तेथे त्वरित व तातडीने सांडपाणी आरसीसी पाईपलाईन करणे आवश्यक आहे.

त्यानुसार उक्त कामाची समक्ष पाहणी करून त्या कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात येऊन त्यास अंदाजीत खर्च रु.९९,३१९/- मात्रचा खर्च अपेक्षित असून सदरील खर्च हा सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या दरसूची नुसार असून तो खर्च योग्य व वाजवी असून त्या खर्चाची नोंद मनपा निधीतून करणे आवश्यक आहे.

तरी उक्त काम हे नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित असल्याने ते काम विना निविदा मे ठेकेदार अलिना कन्स्ट्रक्शन धुळे यांच्याकडून त्वरित व तातडीने करून घेण्यात आले असून ते काम मुंबई प्रांतिक अधिनियम नियम ६७(३)(क) अन्वये व ५(२) (२)अन्वये विना निविदा करण्यास व त्वरित करण्यास मंजुरीसाठी अपेक्षित खर्च रुपये ९९,३१९/- मात्रच्या खर्चास कार्योत्तर मंजुरीसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल लक्षात घेता, प्र.क्र.८ मध्ये माधवपुरा तालीम वाली गल्ली येथे आरसीसी बंदिस्त गटार करण्याच्या कामी झालेल्या रु.९९,३१९/-मात्र खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७(३) अन्वये कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९६** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / बां.वि /९५ दिनांक २३/०५/२०२५

विषय क्रमांक:-५१८ धुळे मनपा आवारत साकारण्यात येणाऱ्या श्रीसंत गाडगेबाबा यांच्या स्मारकाचा चबुतरा बांधणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे मनपा आवारत सरकारण्यात येणाऱ्या श्रीसंत गाडगेबाबा यांच्या स्मारकाचा चबुतरा बांधणे कामास मा.आयुक्त सो., धुळे महानगरपालिका यांच्या दि.३०/०४/२०२५अन्वये रक्कम रु. ७५, ००,१४१/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. उक्त कामाबाबत उप अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ३४ / २०२५-२६ दिनांक ०६/०५/२०२५ अन्वये रक्कम रु. ७५,००,१४१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | हिंद कन्सट्रक्शन | शे.२.२०% जास्तीने | |
| २ | प्रतिक पुरषोत्तम पुरोहित | अंदाजपत्रकीय दराने | सर्वात कमी दर |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून मे. प्रतिक पुरषोत्तम पुरोहित , धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार मे. प्रतिक पुरषोत्तम पुरोहित , धुळे यांची अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दर मान्यतेसाठी मे. स्थायी समितीपुढे सादर झालेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे मनपा आवारत साकारण्यात येणाऱ्या श्रीसंत गाडगेबाबा यांच्या स्मारकाचा चबुतरा बांधणेकामी मे. प्रतिक पुरषोत्तम पुरोहित यांच्या आलेल्या अंदाजपत्रकीय निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९७** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा:-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि.२९/१२/२०२३ अन्वये

२. विभाग प्रमुख यांचे कडील प्रस्ताव यांचे पत्र धुमपा / बां.वि./ १३९ दिनांक १०/०६/२०२५

विषय क्रमांक:-५१९ धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत प्र.क्र. ६ नकाणे रोड ते रमेश टेलर घरापावेतो रस्ता व गटार करणेकामी आलेल्या निविदा दरास मान्यतेस्तव आलेल्या कार्यालयीन अहवालावर निर्णय घेणे.

---

वाचा क्र.०१ व उप अभियंता, बांधकाम विभाग यांचा वाचा क्र.२ च्या प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, धुळे महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत प्र.क्र. ६ नकाणे रोड ते रमेश टेलर घरापावेतो रस्ता व गटार करणे कामास म.जिल्हाधिकारी सो., यांच्या कडील पत्र क्र. कक्ष- ५ / नपाप्र / बांध / १०५३ दि. ०७/१०/२०२४ अन्वये उक्त कामाच्या खर्चास रक्कम रु. ४०,१५,६२८/- मात्र रकमेस आर्थिक व प्रशासकीय मान्यता दिलेली आहे.

उक्त कामाबाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्र./ ३९८/ २०२४-२५ दिनांक २७/०९/२०२४ अन्वये रक्कम रु. ४०,१५,६२८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. उक्त कामाबाबत विहीत पध्दतीने निविदा दर मागविण्यात आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत ऑनलाईन पद्धतीने बयाणा रक्कम भरून निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे /ठेकेदराचे नाव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | सौरभ संजय कदमबांडे | शे.९.९९% कमीने | सर्वात कमी दर |
| २ | गायत्री कन्सट्रक्शन | शे.३.००% जास्तीने | |
| ३ | ऋषभ राजेंद्र पाटील | शे.२.००% जास्तीने | |
| ४ | एकविरा कन्सट्रक्शन | शे.८.९९% कमीने | |
| ५ | रामेश्वर ट्रेडर्स | शे.४.००% जास्तीने | |
| ६ | आदर्श कन्सट्रक्शन | शे.१.००% जास्तीने | |

वरील प्रमाणे निविदेत भाग घेतलेले ठेकेदार पात्र असून श्री.सौरभ संजय कदमबांडे, धुळे यांचे दर शे.९.९९% कमी दराने आहे व त्यांनी नियमा प्रमाणे ऑनलाईन बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री.सौरभ संजय कदमबांडे, धुळे यांची शे.९.९९% कमी दराने आलेले निविदा दर मंजुरी मे. स्थायी समितीपुढे विषय सादर झालेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार, धुळे मनपा हद्दीत नगरोत्थान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत प्र.क्र. ६ नकाणे रोड ते रमेश टेलर घरापावेतो रस्ता व गटार करणेकामी आलेले श्री.सौरभ संजय कदमबांडे, धुळे यांचे शे.९.९९% कमी या आलेल्या निविदा दरास मान्यता देणेत येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**अमिता दगडे-पाटील,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

---

**प्रशासक ठराव क्र.४९८** **दिनांक: १२/०६/२०२५**

---

**वाचा**:-

